महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं. / प्रेस नोट / 147 / पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड /2025 दिनांक : 12 / 04 / 2025

# शहर वाहतूक शाखा वजिराबाद व इतवारा यांची अवैध प्रवाशी वाहतूक, विना वाहन परवाना चालणारी वाहने,गणवेश परीधान न करणारे ॲटोचालक यांचेवरती धडक कारवाई करून एकुण 389 केसेस व 5,30,700 /—रूपयाचा दंड आकारण्यात आला..

**मा. श्री. अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी शहरात वाढत असलेली ट्रॉफिक समस्या अटोक्यात आणनेसाठी शहरात चालणारी अवैध प्रवाशी वाहतूक तसेच विना परवाना / परमिट चालणारे वाहणे, भरधाव वेगाने चालणारी वाहने, तसेच **गणवेश परीधान न करणारे ॲटोचालक** यांचेवरती कार्यवाही करण्याची मोहीम राबविणे बाबत शहर वाहतूक शाखा वजिराबाद व इतवारा यांना आदेशीत केले होते.

त्या अनुषंगाने दिनांक 11.04.2025 रोजी प्रभारी अधिकारी श्री **साहेबराव गुट्टे**, पोलीस निरीक्षक, शहर वाहतूक शाखा, वजिराबाद यांनी सिटीबी स्टाफ यांचे समवेत वजीराबाद चौक, रेल्वे स्थानक, महाराणा प्रताप चौक, तरोडेकर मार्केट व कलामंदिर येथे वाहनावर दंडात्मक कार्यवाही करून 1) ट्रिप्पल सिट केसेस 21 = 21,000 रूपयाचा दंड 2) **गणवेश परीधान न करणारे ॲटोचालक** केसेस 52 = 44,000 रूपयाचा दंड 3) अनपेड केसेस 195 = 3,30,250 रूपयाचा दंड, 4) ई चलनव्दारे पेड केसेस 11 = 8,250 रूपयाचा दंड, 5) ऑनलाईन चलनव्दारे केसेस 07 = 14,950 रूपयाचा दंड अशा **एकुण 286 केसेस करून 4,18,450 /— रूपयाचा दंड आकारण्यात आला.**

तसेच दिनांक 11.04.2025 रोजी प्रभारी अधिकारी श्री **जगन्नाथ पवार**, पोलीस निरीक्षक, शहर वाहतूक शाखा, इतवारा यांनी स्टाफ यांचे समवेत देगलूर नाका, जुना मोंढा व बाफना टि पॉईंट या ठिकाणी मोहिम दरम्यान वाहणांची कागदपत्रे तपासणी, विना परवाना / परमिट चालणारे वाहणे, भरधाव वेगाने चालणारी वाहने, **गणवेश परीधान न करणारे ॲटोचालक** यांचेवर **एकुण 103 केसेस करून एकुण 1,12,250 /— रूपयाचा दंड आकारण्यात आला.**

शहर वाहतूक शाखा वजिराबाद व इतवारा यांनी नांदेड शहरात मोहीम राबवुन अवैध प्रवाशी वाहतूक, **गणवेश परीधान न करणारे ॲटोचालक** यांचेवर **एकत्रीत कार्यवाही करून 389 केसेस व एकुण 5,30,700 /—रू** दंड आकारण्यात आला आहे.

सदरची कारवाई **मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री सुरज गुरव**, अपर पोलीस अधीक्षक नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली शहर वाहतूक शाखा वजिराबाद, इतवारा येथील अधीकारी व अंमलदार यांनी केली आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड